माहितीचा अधिकार प्राधान्य

नोंदणीकृत टपालाने

राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर
दूरध्वनी क्र.०२४०-२३५२५४४/२३५२१३३ फॅक्स क्र.०२४०-२३५२५४४
Email add :- Co.sic.aurangabad@maharashtra.gov.in

सुनावणीचा दि.१३.०१.२०२६ जा.क्र.१८५२० दि.२९.१२.२०२५
व्दितीय अपील क्रमांक :-५३५/२०२३ वेळ दुपारी २.३०वा

प्रति,

१). ॲड अम्रितपाल सिंग खालसा,रा. २०१-२ प्लेजर पार्क पिंटो पार्कच्या समोर ओ.टी. सेक्शन उल्हासनगर जि.ठाणे

अपिलार्थी

२). सहायक अधीक्षक,तख्त सचखंड श्री.हुजुरसाहेब गुरुद्वारा बोर्ड ,अचलनगर नांदेड जन माहिती अधिकारी

३). अधीक्षक,तख्त सचखंड श्री.हुजुरसाहेब गुरुद्वारा बोर्ड ,अचलनगर नांदेड प्रथम अपीलीय अधिकारी

विषय :- केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ नियम १९(३) अन्वये सुनावणी.
संदर्भ :- १. महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,मुंबई, यांचे परिपत्रक क्र.मुमाआ२०१९/प्र.क्र.५०/दि.२५जुन,२०१९
२. रिट याचिका क्र.९९५६/२०२५ मध्ये मा. उच्च न्यायालय बॉम्बे,खंडपीठ औरंगाबाद यांच्या आदेशानुसार .

**मा. उच्च न्यायालय बॉम्बे,खंडपीठ औरंगाबाद, यांनी रिट याचिका क्रमांक ९९५६/२०२५ मध्ये व्दितीय अपील क्रमांक ५३५/२०२३ च्या संदर्भातील न्यायनिर्णय मध्ये देण्यात आलेल्या निर्देशानुसार** केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९ (३) अन्वये मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेसमोर **दि.१३.०१.२०२६** रोजी **दुपारी २.३० वा.** सुनावणी निश्चित करण्यात येत आहे.

सदर नोटीसबाबत आयोगाचे संकेतस्थळ www.sic.maharashtra.gov.in वर सुनावणीच्या तारखेपूर्वी सुनावणी बोर्ड प्रसिध्द करण्यात येतो, त्याचे कृपया वेळोवेळी अवलोकन करावे.

२. प्रकरणातील सर्व अभिलेखांसह उपरोक्त नमुद सर्वांची उपस्थिती सुनावणीस अनिवार्य आहे.**सदर सुनावणीस आपण व्यक्तीश: उपस्थित न राहील्यास, आयोग उचित निर्णय घेईल. विशेष सुचना :- प्रतिनिधी पाठवू नये.**

३. मा.राज्य माहिती आयोगासमोर सुनावणीस हजर राहताना खालील प्रमाणे कागदपत्रे आयोगासमोर सादर करावीत.

अ).अपिलार्थी यांच्या माहिती अर्जात नमूद केलेल्या व व्दितीय अपील निर्णयांच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीच्या पुरावासहीत अहवाल.

तसेच सुनावणीनंतर प्राप्त झालेला अहवाल/माहिती विचारात घेतली जाणार नाही,याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सोबत:- १. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत.
२. व्दितीय अपील क्रमांक ५३५/२०२३ निर्णयाची प्रत.

कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर

**Amritpal Singh Khalsa**
201-2, Pleasure Park, Opp. Pinto Park, O.T Section,
Ulhasnagar – 421 003
M: 9699977445 E: amritpalsinghkhalsa100@gmail.com

22.12.2025

To,
State Information Commission Aurangabad
Bachat Gat Building, Behind Collectors Office
Chh. Sambhajinagar

**Re: IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY BENCH AT AURANGABAD**
**CIVIL WRIT PETITION NO. 9956 OF 2025**

Amritpal Singh Khalsa ...Petitioners
- Versus -
Public Information Officer & Ors ...Respondents

Sir,

Kindly find enclosed herewith authenticated copy of the order dated 16.12.2025 passed by the Hon'ble High Court in the above captioned matter.

Thanking you
Yours Truly

Amritpal Singh Khalsa
Appellant

दिनांक 22 DEC 2025
आवक क्र.:

*Encl: Authenticated copy of the order dated 16.12.2025 passed in Civil. W.P 9956 of 2025.*

Authenticated Copy 4628/25

# IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
# BENCH AT AURANGABAD

## 910 WRIT PETITION NO. 9956 OF 2023

AMRITPAL SINGH KHALSA
**VERSUS**
PUBLIC INFORMATION OFFICER AND OTHERS

Party in Person for the Petitioner
Mr. R. B. Dhanure, AGP for the Respondent/State
Mr. P. P. Mandlik, Advocate for Respondent No.1.

**CORAM : SIDDHESHWAR S. THOMBRE, J.**
**DATE : 16th DECEMBER, 2025**

**P. C. :-**

1. Heard learned counsels for the respective parties.

2. In this petition, the order dated 22.05.2023 passed by the State Information Commission, Aurangabad in Second Appeal No. 535/2023 is challenged.

3. The petitioner who appeared party in person submitted that on 25.10.2022, he sought following information.

> *"1. Please provide me certified copy of the show cause notice issued in the matter of Shri. Akhand Sahib Path fraud case.*
> *2. Please provide me certified copy of the inquiry report submitted by S. Gursagar Singh Sukhmani.*
> *3. Please provide me certified copy of the final*



"Disclaimer Clause
Authenticated Copy
is not a Certified Copy"

*order/memo/result taken in the above case.*
*4. Please provide me certified copy of the entire file and file noting in this regard.*
*5. Name, designation, contact details of 1st appellate authority in this regard."*

4. Pursuant thereto, the State Information Commission by its order dated 22.05.2023 directed the Information Officer to provide information sought at point Nos.2, 3 and 5 within a period of 30 days. However, as far as point Nos.1 and 4, no any findings have been recorded that why the said information was not directed to be provided.

5. In view thereof, I am inclined to partly allow the writ petition and direct the State Information Commission to decide the proceedings afresh insofar as Point Nos. 1 and 4 are concerned, within a period of four weeks from today.

6. All issues are kept open.

7. Interim relief to continue till the State Information Commission decided the matter.

**(SIDDHESHWAR S. THOMBRE, J.)**

"Disclaimer Clause
Authenticated Copy
is not a Certified Copy"

ssp

Authenticated Copy
Section Officer
High Court of Bombay
Bench at Aurangabad

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोर

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
मागे, औरंगाबाद-४३१००१

अपील क्र.५३५/२०२३

श्री. अम्रितपाल सिंग खालसा, : अपिलार्थी
रा. २०१-२, प्लेजर पार्क पिंटो पार्कच्या समोर, ओ.टी. सेक्शन,
उल्हास नगर, जि. ठाणे-४२१००३

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधिक्षक, तख्त सचखंड श्री. हुजूर साहेब गुरुद्वारा बोर्ड अचल नगर, नांदेड : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक, तख्त सचखंड श्री. हुजूर साहेब गुरुद्वारा बोर्ड अचल नगर, नांदेड : उत्तरवादी

(सुनावणी दिनांक २२.०५.२०२३)

निर्णय

अपिलार्थी यांनी दि.१४.०२.२०२३ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे (नोंदणीकृत टपालाद्वारे) कळविण्यात आले. तसेच सदर नोटीस आयोगाच्या संकेत स्थळावरही प्रसिध्द करण्यात आली. वर संबंधीतांना त्यांचे लेखी म्हणने इमेल द्वारे सादर करण्याचे कळविण्यात आले त्यानुसार आज रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. सदर सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी श्री. हरजितसिंग बलवंतसिंग कडेवाले, सहा. अधिक्षक, गुरुद्वारा कार्यालय उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(१) अन्वये जोडपत्र "अ" लावून दि.२५.१०.२०२२ रोजीच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

१. "Please Provide me certified copy of the show cause notice issued in the matter of shri akhand sahib path fraud case.
२. Please provide me certified copy of the inquiry report sumbmitted by S. Gursagar Singh Sukhmani.
३. Please provide me certified copy of the final order/memo/result taken in the above case.

४. Please provide me certified copy of the entire file and file noting in this regard

५. Name, designation, contact details of १[st] appellate authority in this regard.

तदनंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र "ब" मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि.०२.१२.२०२२ रोजी प्रथम अपील दाखल केले.

त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये जोडपत्र "क" मध्ये वर नमुद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगा समोर कथन केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली नाही. ती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे चौकशी संदर्भातील प्रकरणाची माहिती ५ मुद्यांद्वारे मागितलेली आहे. सदर प्रकरणात चौकशीची प्रक्रीया पूर्ण हाऊन निर्णय अंतिम झालेला आहे. मात्र अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही त्रयस्थपक्षाशी संबंधीत असल्यामुळे ती महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक दि.१७.१०.२०१४ नुसार उपलब्ध करुन देता येणार नाही. म्हणून अपिलार्थी यांना माहिती देण्यात आलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या कागदपत्रे व युक्तीवादावरुन असे दिसुन येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास मुदतीत प्रतिसाद देऊन माहिती अथवा वस्तुस्थिती अपिलार्थीस कळविल्याचे दिसुन येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७(१) चा भंग झालेला आहे. तसचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणीची तारीख निश्चित करुन प्रत्यक्षात सुनावणी घेतली नसल्याचे दिसुन येत आहे त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम १९(६) चा भंग दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे चौकशी प्रकरणाची माहिती ५ मुद्यांद्वारे मागितली आहे. माहिती संदर्भात चौकशीची प्रक्रीया पूर्ण होऊन निर्णय अंतिम झाला असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगास अवगत केलेले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र.२,३,५ संदर्भातील माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जात नमुद मुद्दा क्र.२,३,५, च्या संदर्भातील माहिती आयोगाचे आदेश

प्राप्त होताच ३० दिवसाचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.हरजित्तसिंघ बलवंतसिंघ कडेवाले, सहायक अधिक्षक, गुरुद्वारा कार्यालय, नांदेड यांनी विहित मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७(१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द कलम १९(८)(ग) व २०(१) च्या तरतुदीनुसार कारवाई का करण्यात येऊ नये? याचा खुलासा ३० दिवसाच्या आत सादर करावा.

३. तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक, तख्त सचखंड श्री. हुजूर साहेब गुरुद्वारा बोर्ड अचल नगर, नांदेड यांनी प्रस्तुत प्रकरणांत अपिलार्थींच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे प्रशासक, दि. नांदेड शिख गुरुद्वारा सचखंड, मुंबई यांनी सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक क्र. केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ दि.३१.०३.२००८ नुसार कार्यवाही करावी.

४. उपरोक्त निर्देशासह सदर द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र. ५२०३ दि. १३/७/२०२३

प्रत : आवश्यक त्या कार्यवाही करिता

१. प्रशासक, दि. नांदेड शिख गुरुद्वारा सचखंड, मुंबई